# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मा. राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग सदस्य यांच्या दौऱ्यानिमित्त मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयात बैठक संपन्न**

दिनांक 16 डिसेंबर 2023 रोजी मा. श्री. सुभाष पारधी, मा. राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग सदस्य, व श्री. नवीन रोहिला, मा. सदस्य यांचे खाजगी सचिव, नवी दिल्ली यांच्या दौऱ्यानिमित्त मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस माजी खासदार श्री. संजीव नाईक, अति. आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त संजय शिंदे, उपायुक्त कल्पिता पिंपळे, शहर अभियंता दिपक खांबीत, विभागप्रमुख व विविध संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सदर बैठकीत संघेटनेच्या वतीने विविध समस्या व त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी मा. सदस्य यांना निवेदन देण्यात आले. अनुसूचित जाती जमातीसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेने केलेल्या कामाचे सादरीकरण करण्यात आले. मिरा भाईंदर महानगरपालिकेत आस्थापनेत अनुसूचित जाती जमाती कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या आरक्षणाबाबत माहिती देण्यात आली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेने काँक्रिट रस्ता, गटार बांधणे, नाल्यावरील स्लॅब टाकणे, रंगमंच बांधकाम इत्यादी कामे करण्यात येणार असल्याचे सांगितले. या सर्व बाबी लक्षात घेऊन मा. सदस्य यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे काम समाधानकारक असल्याचे सांगितले व केलेल्या कामाचा सविस्तर अहवाल येत्या 30 दिवसात देण्याच्या सूचना दिल्या.